<u>प्रतिवादीं क्रं.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले यांच्यामार्फत उलटतपास सुरु</u>

**११.** हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्रं.२६१/३/४ ही माझ्या आईच्या नावे मृत्यूपत्राने आली. या मृत्यूपत्राला मी किंवा माझ्या बहीणी व भावानी आज अखेर कुठेही आक्षेप घेतलेला नाही हे खरे नाही. आक्षेप घेतल्याची कागदपत्रे मी पुढील तारखेस दाखल करु शकतो. आजही माझी आई सर्वे क्रं.२६१/३/४ याची मालक, ताबेदार आहे हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, मंचक बोंडगे, संजय शिवपुजे व अन्य तीन व्यक्ती यांच्याविरुध्द मी व माझ्या आईने फौजदारी खटला दाखल केला होता. त्याचा फौ.ख.क्रं.९८/२०१६ होता. हे खरे की, त्याकामी मी व माझ्या आई यांची साक्ष शपथेवर झाली आहे. त्या साक्षीमध्ये मी १७ नंबरचा प्लॉट संजय शिवपुजे यांना विक्री देण्याचे ठरले होते असे सांगितले होते हे म्हणणे खरे नाही. आता मला रे.फौ.ख.क्रं.९८/२०१६ मधील माझा जबाब जो निशाणी ७५/३ लगत आहे तो दाखविला त्यामध्ये रेखांकीत **अ** हा भाग आता मला वाचून दाखविला. तो चुकीचा आहे. त्यास **निशाणी ७६** देण्यात येते. आता मला ७५/१ लगतची फिर्याद दाखविली ती माझ्या आईने केलेली आहे. त्यावरील अंगठा माझ्या आईचा आहे. त्यात आरोपी क्रं.२ मंचक बोंडगे हे आहेत. हे खरे की, फिर्यादीतील परिच्छेद ५ मधील मजकूर बरोबर आहे. फिर्यादीस **निशाणी ७७** देण्यात येते. माझ्या सांगण्याप्रामाणे १७ नंबरचा प्लॉटचा व्यवहार मंचक बोंडगे बरोबर झाला. फौ.ख.क्रं.९८/२०१६ मध्ये या प्लॉटच्या ठरावाचा व्यवहार संजय शिवपुजेसोबत झाला असे मी खोटे सांगितले. निशाणी ७६ मधील परिच्छेद ३ मधील ओळ क्रं.२ पासून पुढील मजकूर आता मला वाचून दाखविला. तो मजकूर बरोबर आहे. मंचक बोंडगे यांना करुन दिलेल्या खरेदीपत्राच्या वेळी मी व आई हजर होतो व त्यावर माझी सही व आईचा अंगठा हे म्हणणे बरोबर आहे. आता मला सदरचे खरेदीपत्र नि.क्रं.४/१ दाखविले. त्यामध्ये मंचक बोंडगे यांची सही, अंगठा, माझ्या आईचा अंगठा, साक्षीदार म्हणून माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ७८**

देण्यात येते. त्यातील धनादेश क्रं. ००१४९२ व ००१४९१ हे वठले. दि.०७/०४/२०१५ व दि. ०८/०४/२०१५ रोजी माझ्या आईच्या महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा किनगाव येथील खात्यावर अनुक्रमे रु.४,५०,०००/- व ५०,०००/- जमा झाले. मी सांगतो की, ती रक्कम दुस-या व्यवहाराची आहे. या खरेदीपत्राप्रमाणे आज अखेर मंचक बोंडगे यांचा या मिळकतीत कब्जा आहे हे म्हणणे खरे नाही.

**१२.** मी सर्वाधिकारपत्रकधारक म्हणून आईच्या वतीने साक्ष दयायचा मला अधिकार नाही हे म्हणणे खरे नाही. माझी आई व संजय शिवपुजे यांच्यात दि.०८/०४/२०१५ रोजी सर्वे क्रं.२६१/३/४ मधील प्लॉट क्रं. १ बाबत तोंडी व्यवहार झाला होता हे म्हणणे खरे नाही. अशा स्वरुपाचे बयान माझ्या आईने फौ.ख.क्रं.९८/२०१६ मध्ये दिले होते हे म्हणणे खरे नाही. आता मला माझ्या आईचा फौ.ख.क्रं.९८/२०१६ मधील जबाब दाखविला. त्यामध्ये परिच्छेद क्रं.६ मध्ये या सौद्याचा उल्लेख आहे तो खरा नाही. हे खरे नाही की, त्यानुसार दि.२६/०६/२०१५ रोजी मी, माझी आई, संजय शिवपुजे, राम शिंदे, नंदकुमार रोडे, तुकाराम भदाडे असे मिळून संजय शिवपुजे यांच्या लाभात ठरलेल्या प्लॉटचे खरेदीपत्र करुन दिले. माझ्या आईचे सदरचे बयान तिने दिल्याचे मला माहिती नाही. त्यामुळे माझ्या आईच्या वतीने मी देत असलेली साक्ष बेकायदेशीर व चुकीची आहे हे म्हणणे खरे नाही. आता नि.क्रं.४/२ लगतचे खरेदीपत्र दाखविले त्यावरील अंगठा माझ्या आईचा आहे हे मी सांगू शकणार नाही. कारण त्या खरेदीपत्राला मी हजर नव्हतो. माझ्या आईचा अंगठा मी ओळखून शकणार नाही. आईचा अंगठा ओळखता येत नसेल तर आईतर्फे साक्ष दयायचा मला अधिकार नाही हे खरे नाही. मंचक **साठेला** करुन दिलेले खरेदीपत्र कायमस्वरुपी नाही असे मी खोटे सांगितले हे म्हणणे खरे नाही. मंचक बोंडगे यांच्याकडून रु. २ लाख आम्ही व्याजाने घेतले होते असे खोटे सांगतो हे म्हणणे खरे नाही. जागेचा कब्जा भागीरथीबाईकडे आहे असे मी खोटे सांगतो हे म्हणणे खरे नाही. २६१/३/४ या मिळकतीचा सातबारा उतारा मी हजर केला नाही हे खरे आहे. हे खरे की, मी दाखल केलेला लाईटबिलावर घर क्रंमाक, सर्वे क्रंमाक नाही. वादमिळकतीची किंमत वाढली आहे हे खरे नाही. त्यामुळे जास्त पैसे उकळता यावेत म्हणून मी हा

दावा केला हे खरे नाही. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**प्रतिवादी क्रं. १ साठी उलटतपास पूर्ण.**

**प्रतिवादी क्रं.२ तर्फे श्री.उप्पे वकीलामार्फत उलटतपास सुरु.**

**१३.** हे खरे की, रे.दि.मु.क्रं.५३/२०१६ मध्ये असलेल्या प्रतिवादी संजय शिवपुजे यांच्याविरुध्द असलेल्या दाव्यात दि.२४/११/२०२५ रोजी माझी साक्ष पूर्ण झाली. रे.दि.मु.क्रं.५३/२०१६ मधील दावामिळकतीच्या पश्चीमेकडील मिळकत म्हणजे या दाव्यातील वादमिळकत आहे हे म्हणणे खरे आहे. रे.दि.मु.क्रं.५३/२०१६ मध्ये मंचक बोंडगे यांचा आणि माझ्या आईचा प्लॉट क्रं.१७ बद्दल व्यवहार झाल्याबद्दल उल्लेख आहे याबद्दल मला माहिती नाही. हे खरे की, रे.दि.मु.क्रं.५३/२०१६ व ५४/२०१६ मधील दावामिळकत सर्वे क्रं.२६१/३/४ मधील आहे. माझ्या आईने प्र.वादी क्रं.१ च्या लाभात दि.०७/०४/२०१५ रोजी दावामिळकतीचे खरेदीपत्र करुन दिले हे खरे आहे. हे खरे नाही की, त्यासाठी मुद्रांक व दस्ताचा खर्च मंचक बोंडगे यांनी केला. हे खरे की, या खरेदीपत्राच्या आधारे प्र.वादी क्रं. १ च्या महसुल दफ्तरी नोंद झाली. हे खरे की, या दाव्याशिवाय मंचक बोंडगे यांच्या खरेदीपत्राला वादीने आक्षेप घेतलेला नाही. हे खरे की, रे.दि.मु.क्रं.५३/२०१६ मध्ये संजय शिवपुजे यांच्या हक्कात असलेल्या खरेदीपत्राच्या अगोदर या दाव्यातील खरेदीपत्र झालेले आहे. आता मला नि.क्रं.४/२ लगतचे खरेदीपत्र दाखविले. ते संजय शिवपुजे यांच्या लाभातील आहे. या खरेदीपत्रातील मिळकतींच्या चतु:सिमांमध्ये पश्चीमेला मंचक वसंत बोंडगे यांचा प्लॉट असा उल्लेख आहे. वादमिळकतीचा ग्रामपंचायत मिळकत क्रं.४११५ आहे हे मला माहिती नाही. साक्ष देण्यापूर्वी मी कागदपत्रांची माहिती मी वादीकडून घेतलेली नाही. हे खरे की, वादमिळकत अहमदपूर-अंबाजोगाई रस्त्याच्या उत्तरेला आहे. हे खरे की, वादीने प्र.वादी क्रं. १ यांना मिळकत विकण्यापूर्वी त्या मिळकतीचे खाजगी रेखांकन नकाशा तयार केला होता. हे खरे की, क्रं.२६१/३/४ या मिळकतीमध्ये माझ्या आईच्या नावे १ हेक्टर ८१ आर क्षेत्र आहे. हे खरे नाही की, या सगळ्या क्षेत्रात भूखंड निर्माण केलेला आहे. यातील १ हेक्टरमध्ये भूखंड तयार केले आहेत. हे खरे की, गरजेनुसार या १ हेक्टर मधील भूखंड आम्ही विकतो.

विकलेल्या भूखंडाची काही कागदपत्रे याकामी हजर केलेली आहेत. दावा परिच्छेद ६ मधील उल्लेख हा संजयला विकलेल्या प्लॉटबद्दल असल्यामुळे केलेला आहे. प्र.वादी क्रं.१ हे दावामिळकतीचे खरेदीपत्राप्रमाणे मालक झाले हे खरे आहे. हे खरे नाही की, या मिळकतीचे ताबेदार झाले. प्र.वादी क्रं. १ ने प्र.वादी क्रं.२ ला दावामिळकत दि.३०/०७/२०२१ रोजी खरेदीपत्राने विकली याबद्दल मला माहिती नाही. प्र.वादी क्र.१ व २ मधील दावामिळकतीच्या खरेदीविक्रीच्या व्यवहाराची मला माहिती नाही. प्र.वादी क्र २ ने प्र.वादी क्रं. १ कडून मिळकत खरेदी घेण्यापूर्वी तिची सर्व कागदपत्रे पाहिली होती याची मला काहीच माहिती नाही. माझी आई साक्ष दयायला असमर्थ आहे असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी हजर केलेला नाही हे म्हणणे खरे आहे. हे खरे नाही की, प्र.वादी क्रं.१ ने प्र.वादी क्रं. २ ला खरेदीपत्र करुन देताना न्यायालयाचा मनाई हुकूम नव्हता. हे खरे की, प्र.वादी क्रं.२ यांच्या नावे कागदोपत्री दावामिळकत नोंद आहे. दाव्यामध्ये भागीरथीबाई ही आपल्या मुलांसह दावामिळकतीत विटा व पत्र्याचे शेड घालून रहाते असा उल्लेख केलेला नाही हे खरे आहे. याबद्दलचा शपथपत्रातील मजकूर पहिल्यांदाच लिहीला याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, दाव्यातील व्याजाबद्दलचा आणि पोकळ खरेदीपत्राबद्दलचा मजकूर दाव्यास काहीतरी कारण असावे म्हणून लिहीला आहे. प्र.वादी क्रं.२ सोबत माझा काही वादी नाही हे खरे आहे. प्र.वादी क्रं.१,२ व संजय शिवपुजे हे रोज कुठे जातात, काय करतात याबद्दल मला माहिती नाही. शपथपत्रात प्र.वादी क्रं.१ च्या लाभात झालेलया खरेदीपत्राबाबतचा मजकूर वगळता सरतपासातील बाकी मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. दावामिळकतीतून अहमदपूर-अंबाजोगाई हा रस्ता गेला हे खरे आहे. त्यामुळे या जमीनीचे मुल्य वाढले हे खरे नाही. खाजगी रेखाकंनातील प्लॉट क्रं.२ वगळता प्र.वादी क्रं. १ सोबत माझ्या आईचा अन्य प्लॉट बाबत अन्य कोणताही व्यवहार झाला नव्हता हे म्हणणे खरे नाही. डे.बुक.क्रं.१००२/२०१५ हे खरेदीपत्र सुरक्षीतेपोटी करुन दिलेले आहे असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. हे खरे नाही व्याजदर मनघडत आहे. हे खरे नाही की, दावामिळकत ही त्यातून अंबाजोगाई रस्ता गेल्याने गिळंकृत करता यावी म्हणून मी खोटा दावा केला. दाव्यात मी संजयला पक्षकार केले नाही हे

खरे आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**
**दिनांक:०४/१२/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**